महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र.: तंशिविकापु/आस्था-३(ब)/निवृत्तीवेतन/२०२३/ ५५९३ दिनांक : 01 DEC 2023

परिपत्रक :

विषय : सेवानिवृत्त कर्मचा-यांची निवृत्तीविषयक कागदपत्रे महालेखापाल कार्यालयाकडे पाठविताना परिपूर्ण व योग्य रीतीने पाठविण्याबाबत सूचना.

संदर्भ : मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील निर्देश पत्र क्रमांक ५/तंशिसं/निवृत्तीवेतन/२०२३/५२७, दिनांक २८/११//२०२३.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सेवानिवृत्तीवेतन / कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरणातील विलंब टाळून प्रकरणे अंतिमत: निकाली काढणे संदर्भात संचालनालयाने उपरोक्त संदर्भानुसार निर्देश दिलेले आहेत. (सोबत सदर निर्देश पत्राची प्रत जोडली आहे)

तरी या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, संदर्भित निर्देश पत्रात दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन, सेवानिवृत्तीवेतन / कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरणी विहीत कालावधीत सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे / कुटुंब निवृत्तीवेतन प्रकरणे जलद गतीने निपटारा करुन संबंधित मा. महालेखापाल कार्यालयांना सादर करावीत, अन्यथा होणा-या विलंबास संबंधित संस्था / कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

(डॉ. द. व्यं. जाधव),
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : वरील प्रमाणे.

प्रति,

या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुख.

प्रत : मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरिता सादर.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्र.022-68597405/425/472
ई-मेल—desk5@dtemaharashtra.gov.in

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

जा. क्र: ५/तंशिसं/निवृत्तीवेतन/२०२३/ ५२७

दिनांक : 28 NOV 2023

प्रति,

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ
बांद्रा(पूर्व), मुंबई.

विषय :- सेवानिवृत्त कर्मचा-यांची निवृत्तीविषयक कागदपत्रे महालेखापाल कार्यालयाकडे पाठविताना परिपूर्ण व योग्य् रितीने पाठविण्याबाबत सूचना.

संदर्भ :- १) शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२२/सं.क्र.२४१/२०२२/तांशि-३ दि.०९.०५.२०२२
२) मा.महालेखाकार (लेखा व हकदारी) , महाराष्ट्र, नागपूर कार्यालयाचे पत्र क्र. PM/Retd Cases/Mar-२०२२/६ दि.२८.०४.२०२२
३) संचालनालयाचे परिपत्रक क्र.५/तंशिसं/निवृत्तीवेतन/परिपत्रक/२०२२/२६४ दि.०८/०६/२०२२.
४) शासन पत्र क्र. बैठक-२०२३/संदर्भ क्र.२९४/समन्च्य कक्ष दि.१६.११.२०२३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन शासन पत्र क्र.४ अन्वये मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८/११/२०२३ रोजी मा.महालेखाकार (लेखा व हकदारी) कार्यालय, महाराष्ट्र, नागपूर यांनी पाठविलेल्या यादीतील प्रलंबित सेवानिवृत्ती वेतनप्रकरणी आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

यास अनुसरुन संदर्भाधिन शासन पत्र क्र.३ व त्यासोबत पृष्ठांकित केलेल्या मा.महालेखाकार (लेखा व हकदारी) कार्यालय, महाराष्ट्र, नागपूर यांनी आपल्या विभागातील सादर झालेल्या सेवानिवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरणी त्रुटींच्या पूर्ततेसाठी परत पाठविलेली आहे. परंतु आपल्या विभागातील सदर त्रुटींची पूर्तता होऊन आवश्यक कागदपत्रे माहिती /खुलाश्यासह अद्यापही सेवानिवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरणे सादर केलेली नाहीत. त्यामुळे संबंधितांची सेवानिवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरणे मा.महालेखाकार कार्यालयात प्रलंबित राहिलेली आहेत. त्यामुळे विनाकारण पत्रव्यवहार वाढून सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या तक्रारी महालेखापाल कार्यालयास प्राप्त होत आहेत.

त्याअनुषंगाने संचालनालयाचे संदर्भ क्र.३ चे परिपत्रकान्वये आपणांस वेळोवेळी सुचित करण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.४ अन्वये मा.प्रधान सचिव यांनी दि.२८/११/२०२३ रोजी आढावा बैठकीत दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने सेवानिवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरणातील विलंब टाळून प्रकरणे अंतिमत: निकाली काढण्यासाठी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) आपल्या अधिपत्याखालील आपल्या कार्यालयासह सर्व शासकीय संस्थांतील अधिकारी/ कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीवेतनप्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ मधील नियम ११८ नुसार सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-यांची यादी तयार करावी.

२) सेवानिवृत्तीवेतनप्रकरणी मा.महालेखापाल कार्यालयाने कळविलेल्या त्रुटींची पूर्तता तात्काळ करण्यात येऊन आवश्यक कागदपत्रे, माहिती /खुलाश्यासह सेवानिवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरण तात्काळ संबंधित मा.महालेखापाल कार्यालयांना सादर करावीत.

३) महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ मधील नियम १२३(४) मधील तरतूदीनुसार शासकीय अधिकारी/कर्मचा-यांची पेन्शन केस ऑनलाईन सादर करताना विहीत कालावधीत म्हणजेच सेवानिवृत्तीपूर्वी किमान ६ महिन्यांच्या आत सादर करावी.

४) सर्व आहरण व संवितरण अधिका-यांना सूचित करण्यात येते की, सेवानिवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरण ऑनलाइन सादर करताना संबंधित सेवानिवृत्तीवेतनधारक/ कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांचा मोबाईल क्र. तसेच इ-मेल आयडीसह सादर करावा.

सोबत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती व नागपुर यांच्या अधिपत्याखालील संस्थातील कर्मचा-यांची प्रलंबित प्रकरणांची यादी जोडत आहे.तरी सदर प्रलंबित सेवानिवृत्ती वेतनाचा निपटारा १ आठवडयात करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

तसेच सर्व विभागीय कार्यालयांनी उपरोक्त नमूद निर्देशांचे पालन करुन सेवानिवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरणी कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांना देण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिपत्याखालील संस्थातील प्रलंबित सेवानिवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन प्रकरणी विहीत कालावधीत सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे /कुटुंब निवृत्तीवेतन प्रकरणे जलदगतीने निपटारा करुन संबधीत मा.महालेखापाल कार्यालयांना सादर करावीत.अन्यथा होणा-या विलंबास संबंधित सहसंचालक व संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

(डॉ.विनोद म.मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

प्रत :- १) मा.प्रधान सचिव, उच्च् व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना संदर्भीय १च्या पत्रानुसार माहितीकरिता सविनय सादर.

२) मा.महालेखाकार (लेखा व हकदारी) कार्यालय, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर यांना माहितीकरिता